मातृभूमि

# लक्ष्मीबाई गणगणे महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा




**अकोट ।** येथील लक्ष्मीबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षे बाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सुमित संजय सपकाळ, व अनिकेत विजय भुडके या सायबर वॉरियर्सनी ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ॲप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेब साईटस कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ.हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक,व ,शिक्षिका पाटील, पवार, झाडे, मानकर, वानरे, घाटे, चेडे ,लोणारे, व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.